अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

**पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या उपस्थित रमेश आडसकर यांचा पक्षप्रवेश!**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बीड जिल्ह्याची धुरा रमेश आडसकर यांच्या खांद्यावर येण्याची दाट शक्यता?**

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २१४ ■ मंगळवार दि.२२ एप्रिल २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 214 ■ Tuesday Dt.22 April 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# रमेश आडसकरांनी बांधली अजित दादांच्या पक्षाची घड्याळ हाती..!

## अजितदादांच्या राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी रमेश आडसकर यांच्याकडे येण्याची शक्यता?

- रमेश आडसकर यांच्या प्रवेशाने अजितदादांच्या पक्षाची ताकद वाढणार आणि राजकीय बदल दिसणार!
- नवीन चेहरा म्हणून रमेश आडसकर यांना नेतृत्वाची संधी मिळणार; राजकीय उलथापालथ होण्याची शक्यता?
- विधानसभे अगोदर शरद पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये प्रवेश तिकीट तिकीट न मिळाल्यामुळे आडसकर होते नाराज
- रमेश आडसकर यांच्या पक्षप्रवेशामुळे राजकीय समीकरणे बदलणार आणि संघटनात्मक बद्दल घडून येणार!
- माजलगाव मतदार संघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करत लढवली होती विधानसभा निवडणुक!

बीड । प्रतिनिधी

विधानसभेच्या अगोदर यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादी मध्ये प्रवेश केला होता पण त्यांनी तिकीट न मिळाल्यामुळे अपक्ष उमेदवारी माजलगाव मतदार संघातून दाखल खेळत विधानसभा लढवली होती आता बीड जिल्ह्यात अजित पवारांच्या राष्ट्रवादीने शरद पवारांच्या पक्षाला मोठा धक्का दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातील बीड जिल्ह्यातील नेते रमेश आडसकर यांचा आज राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षात प्रवेश होणार आहे. रमेश आडसकर यांनी विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळी भाजपाला सोडचिठी देत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्या पक्षात प्रवेश केला होता. आज संध्याकाळी पाच वाजता रमेश आडसकर आपल्या समर्थकांसह पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थित पक्षात प्रवेश करणार आहेत. यामुळे बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद वाढलेली असून मोठे राजकीय बदल दिसून येणार आहेत. रमेश आडसकर यांचा केज, आंबेजोगाई, माजलगाव तालुक्यांसह सर्व सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये गावागावात मोठा जनसंपर्क असून मोठा कार्यकर्ता वर्ग त्यांच्यासोबत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश होणार असून राष्ट्रवादी अजित पवार गटाची ताकद वाढलेली दिसून येत आहे.

रमेश आडसकर यांचा पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम आडस येथे होणार होता परंतु पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या व्यस्ततेमुळे हा प्रवेश कार्यक्रम मुंबई येथे पार पडणार आहे. दरम्यान रमेश आडसकर यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश झाला असल्याने बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद वाढलेली असून नवीन चेहऱ्यांना नेतृत्वाची संधी

पान २ वर



रमेश आडसकर हे भाजपाच्या बालेकिल्ल्यातून आता राष्ट्रवादीचा काँग्रेसचा बालेकिल्ला जिंकण्यात यशस्वी होणार आहे. मराठा समाजातील मोठा चेहरा म्हणून रमेश आडसकर यांच्याकडे पाहिले जाते. रमेश आडसकर हे दलित मुस्लिम यांच्यासह अठरापगड जातीतील लोकांच्या सुखदुःखामध्ये नेहमी हजर राहणारा एकमेव नेता म्हणून त्यांची ओळख आहे. माजलगाव विधानसभेतून दोन वेळा पराभव झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी शेतकऱ्यांच्या बांधावरती उभा राहणारा व जनतेच्या समस्या जाणून घेणारा नेता म्हणून रमेश आडसकर यांची ओळख आहे. तसेच रमेश आडसकर हे लोकप्रिय नेतृत्व असल्यामुळे त्यांच्या माध्यमातून अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला बीड जिल्ह्यामध्ये सहा मतदारसंघांमध्ये एक चांगल्या प्रकारची ताकद मिळणार आहे. त्यामुळे आत्ता अजित पवार यांनी राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्ष पदाची धुरा रमेश आडसकर यांच्या खांद्यावर देण्याची दाट शक्यता असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

# बीड नगरपालिकेतील भ्रष्टाचाराने बरबटलेला लेखापाल गणेश पगारेंची अखेर तडकाफडकी बदली!

## बीड नगरपालिकेतील भ्रष्टाचाराचा पाढा दैनिक महाराष्ट्र आरंभने आणला होता चव्हाट्यावर!

### पगारे दिसतं तसं नसतं म्हणून जग फसतं, भ्रष्टाचाराचा शहाणपणा भोवला?

- आ. संदीप क्षीरसागर यांच्यावर पोलिसात गुन्हा दाखल करणे गणेश पगारेला भोवले?
- स्वतःला मोठा जहागीर समजणारा गणेश पगारेंची अखेर कर्तव्यापासून लांब
- दैनिक महाराष्ट्र आरंभने वेळोवेळी आवाज उठवला होता?

बीड । प्रतिनिधी

बीड नगर परिषदेमध्ये लेखापाल गणेश पगारे मोठा भ्रष्टाचार केला आहे. सदरील भ्रष्टाचार हा सायं दैनिक महाराष्ट्र आरंभने वेगवेगळ्या बातम्या प्रकाशित करून उघडकीस आणला होता. त्या अनुषंगाने लेखापाल गणेश पगारे यांची तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. फक्त लेखापाल गणेश पगारे यांची बदली करून चालणार नाही तर सखोल चौकशी करून कारवाई होणे गरजेचे आहे. लेखापाल गणेश पगारे हे भ्रष्टाचाराने बरबटलेला म्हणून त्यांची एक ओळख झाली होती. त्यांनी केलेला भ्रष्टाचार सायं दैनिक महाराष्ट्र आरंभने बाहेर काढला होता. दैनिक सायं महाराष्ट्र आरंभने केलेल्या बातम्यांचा मोठा दणका बसला आहे. त्यामुळे भ्रष्टाचाराने बरबटलेला लेखापाल गणेश पगारे यांची परभणी जिल्ह्यातील जिंतूर येथे बदली करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षापासून बीड नगरपालिकेत ठाम मांडून बसलेले लेखापाल गणेश पगारे यांनी मोठा भ्रष्टाचार केलेला आहे. त्यांनी नगरपरिषदेत मनमानी कारभार करत नगरपरिषदेतील सफाई कामगारांचे प्रकरण. तसेच नातेवाईकांच्या नावाने पगारी उचलत असल्याची अनेक तक्रारी होत्या. परंतु लेखापाल गणेश पगारे कुणालाही न जुमानता मोठा भ्रष्टाचार केला. बीड जिल्ह्यातील व शहरातील आजी-माजी आमदार राजकीय नेते अधिकारी कर्मचारी यांची अशी

संगणमताने कोटच्वधी रुपयांचा घोटाळा यांच्या समवेत अनेक रती महारथी यांना हाताशी धरत होता घोटाळा करत असणारा लेखापाल पगारे यांनी केलेला भ्रष्टाचार अंगलट आला असल्याची चर्चा रंगत आहे. लेखापाल गणेश पगारे यांनी भ्रष्ट कारभाराचा आदर्श घेऊन स्व:ताच्या पायावर स्वतःच दगड मारून घेतला आहे. अशावेळी अनाधिकृत कर्तव्यदक्ष कारभारामुळे गणेश पगारे सातत्याने चर्चेत होते परंतु त्यांनी नगरपरिषदेत

पान २ वर





“

काही दिवसापूर्वी आमदार संदीप क्षीरसागर यांचे पीए हे गणेश पगार यांच्या घरी जाऊन त्यांना फोनवरती धमकी आमदार यांनी दिली असल्याची तक्रार बीड पोलीस स्टेशन या ठिकाणी त्यांनी तक्रार दिलेली आहे त्यामुळे गणेश पगार यांची बदली झाल्याची ही चर्चा सध्या बीड शहरामध्ये आहे कारण आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासोबत वैर घेणे गणेश पगारे यांना परवानांनाही अशी चर्चा बीड शहरांमध्ये चालू आहेत?

## जनतेच्या मनात घर करणारा नेता
# संघर्षातून पुढे आलेले नेतृत्व मनोज (तात्या) हजारे

एका सामान्य घरातील मुलगा असलेल्या मनोज हजारे युवा नेतृत्व कार्यापर्यंत खडतर प्रवास निश्चितच इतरांसाठी प्रेरणादायी आहे. आमचे लाडके नेते मनोज तात्या हजारे यांची कार्यपद्धती पाहता आमच्या सारख्या सामान्य कार्यकर्त्यांचे स्वाभिमाने उर भरून आल्याशिवाय राहात नाही. तात्यांनी आपला साधेपणा जपत, प्रत्येकाच्या मनात आपल्या नावाचं घर निर्माण केलं आहे. यासाठी प्रचंड कष्ट, त्याग, समर्पण या गोष्टींमधून तावून-सुलाखून आपलं वेगळं नेतृत्व सिद्ध करत आपल्या नावाची वेगळी छाप पाडली आहे. स्वर्गीय अमोल (भैय्या) गलधर यांच्या माध्यमातून गेवराईच्या राजकारणात राष्ट्रवादीच्या विद्यार्थी शहराध्यक्ष म्हणून कार्य करण्याची संधी मिळाल्यानंतर यांची युवकांना सोबत घेऊन पक्ष व संघटन करण्याची बुलेट ट्रेन सुसाट सुटली आहे. तेव्हापासून समाजातील विविध घटकांपर्यंत शासनाच्या विविध योजना पोचविण्याचे कार्य केले आहे. याशिवाय लोकाहिताच्या कामास त्यांनी प्राधान्य दिले आहे. परंतु, खरी मदत कशी करायची असते, हे त्यांनी समाजकारण करत राजकारणात पाऊल टाकल्यानंतर तालुक्यातील जनतेला दाखवून दिले आहे.अनेक मित्रांशी स्नेहपूर्ण संबंध निर्माण करून प्रत्येक माणसाला आधार देणारा, संकटालाही आपलाच करणारा तरुण ठरतोय. तात्यांवर अनेक संकट आले मात्र अद्याप ते डगमगले नाही. समाजकारणाच्या व राजकारणाच्या माध्यमातून त्यांनी वेगळी ओळख तालुक्यात निर्माण केली आहे. या नेतृत्वातील काम करण्याची ऊर्मी आम्हा तरुण कार्यकर्त्यांना अचाट ऊर्जा देणारी आहे. त्यांनी तालुक्यात आजपर्यंत विविध क्षेत्रात घडवून आणलेली युवा क्रांती तालुक्याचा चेहरामोहरा बदलण्यात मोलाची ठरली आहे.



मित्र मंडळाच्या वतीने रुग्णांसाठी रुग्णवाहिका देखील तात्यांनी सुरू केली ती रुग्णवाहिका २४ तास रुग्णसेवसाठी उपलब्ध असते. रुग्णवाहिकेतून अनेक रुग्णांना सेवा देण्याचे काम तात्यांनी केला आहे तात्या, जनतेशी आपली जुळलेली भावनिक मायेची नाळ मी जवळून अनुभवली आहे. समाजासाठी काम करण्याची तळमळ आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहित करते. आजपर्यंत आपण कितीतरी दुःखात असणाऱ्या माणसांना आधार देवून सावरले आहे. आपल्या राजकीय कारकिर्दीत कित्येकांच्या फाटलेल्या संसारांना आधाराची ठिगळे लावली आहेत. आपण कायमच स्वतःपेक्षा दुसऱ्यांसाठीच जगत आलात. खरचं सोपं नसतं इतरांसाठी जगणं. सोपं नसतं इतरांच्या आनंदात आनंदी होणं. त्यासाठी खूप मोठं मन असावं लागतं.. अगदी तुमच्यासारखं...!

समाजाच्या हितासाठी झटण्याची तुमची तळमळ आम्ही अगदी जवळून बघितली आहे. सकाळी लवकर सुरु होणारा तुमचा दिवस रात्री उशिरापर्यंत फक्त लोकांची कामे मार्गी लावण्यात घालवता. मग तो युवक आहे का वृद्ध आहे, याचा विचार तुमच्या मनात कधीच येत नाही. तात्या तुमची तळमळ असते प्रत्येकाला योग्य न्याय मिळण्यासाठी... यासाठी तुम्ही कधीही लढायला तयार असता. तात्या आपल्या रक्तात असणारी जिद्द आणि स्वाभिमानीपणा कायमच आम्हाला अवाक् करत आला आहे. अखंड माणुसकीचा झरा जपणारं आपलं नेतृत्व कायम असणे हीच गेवराई तालुक्याला गरज आहे. 'मला मतांसाठी राजकारण करायचं नाही, तर लोकांच्या प्रश्नांसाठी लढायचं आहे. कोणावर अन्याय झाला, तर हा तात्या तुमच्यासाठी लढायला हजारदा तयार आहे,' असं सांगणारा आजच्या राजकारणातला एकमेव नेता म्हणजे मनोज तात्या हजारे हे होय. आपलं अवघं आयुष्य या समाजासाठी खर्ची घातलेल्या आमच्या लाडक्या नेत्यांचा वाढदिवस... हा दिवस तुमचा आहे, या तालुक्यासाठी प्रामाणिकपणाने केलेल्या कर्तृत्वाचा आहे. तात्या आपणास या वाढदिवसाच्यानिमित्ताने कोटी कोटी शुभेच्छा... शतायुषी व्हा..!!

**लेखक -शुभम घोडके पत्रकार गेवराई मो.८३०८३९०००८**

# पद्मपाणी राज्य राष्ट्रीय पुरस्कार जाहीर
## हजारे, सावंत, मुळे, नागरगोजे, उपाध्ये, यांना आदर्श पत्रकारिता पुरस्कार जाहीर



बीड | प्रतिनिधी

बीड शहरात मागील १७ वर्षापासून संविधान दिनाच्या अनुषंगाने विविध क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या गुणवंत व्यक्तींना पद्मपाणी प्रतिष्ठानच्या वतीने पद्मपाणि राष्ट्रीय, राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानीत केले जाते.

या वर्षीच्या या पुरस्कारासाठी बीड जिल्ह्यासह राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून आपली आगळीवेगळी ओळख निर्माण करणाऱ्या गुणवंत कर्तुत्ववान व्यक्तीच्या कार्याची दखल घेऊन प्रतिष्ठांच्या वतीने दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्कारांसाठी विविध क्षेत्रातील गुणवंत कर्तुत्ववान व्यक्तीची निवड करण्यात आली असून ०४ मे रोजी बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहामध्ये मान्यवरांच्या शुभहस्ते या पुरस्काराचा वितरण करण्यात येणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीप तरकसे यांनी दिली.

यावर्षीच्या पुरस्कारांमध्ये पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या पत्रकारांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. यामध्ये दै.लोकाशाचे निवासी उपसंपादक उत्तम हजारे, दै. रिपोर्टर बीड चे कार्यकारी संपादक गणेश सावंत, दै. पुढारी न्यूजचे बीड जिल्हा प्रतिनिधी उदय नागरगोजे, दै. लोकनायकच्या संपादिका सौ अक्षरा मुळे, दैनिक दिव्य मराठीचे ब्यूरोचिप अमोल मुळे, साप्ताहिक आदर्श पोलखोलचे संपादक नितेश उपाध्ये यांना आदर्श पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. असे जाहीर करण्यात आल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीप तरकसे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकांद्वारे दिली आहे.

# बीडमध्ये मांग गारुडी समाजाच्या सभागृहाचे काम प्रगतीपथावर
## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली पाहणी

बीड | प्रतिनिधी

शहरातील प्रकाश आंबेडकर नगर येथे सुरू असलेल्या मांग गारुडी समाजासाठीच्या सभागृह बांधकामाची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.२२) पाहणी केली. त्यांनी विधानसभा निवडणुकीदरम्यान समाजबांधवांसाठी सभागृह उभारण्याचे आश्वासन दिले होते, त्या आश्वासनाची पूर्तता केली आहे.



सदरील काम सध्या प्रगतिपथावर असून लवकरच ते पूर्ण होणार आहे. कामाचा दर्जा पाहता समाजातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, डॉ.योगेश क्षीरसागर यांचे आभार मानले. याप्रसंगी गोरख काळे, कल्याण अंकुशे, गणेश रोकडे, करण काळे, दिनेश चौगुले, बंडू कुसळकर, रवी काळे, लखन काळे, रवी रोकडे, संदीप काळे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधत भविष्यातही समाजाच्या विकासासाठी अशाच प्रकारे कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

# नामदार पंकजाताई मुंडे यांची संकल्पना सत्यात उतरवून बिंदुसरा नदी स्वच्छतेचे काम सुरू
## पंकजाताईंच्या प्रत्येक आवाहनाला साथ देत समाज हिताची कामे करत राहू : गणेश लांडे

बीड | प्रतिनिधी

वसुंधरा दिना निमित्त राज्याच्या पर्यावरण मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून शासकीय पातळीवर व सामाजिक पातळीवर नदी नाले स्वच्छ करून त्यांचे संवर्धन करण्याचे आवाहन केले होते त्या आवाहनाला साथ देत भारतीय जनता पार्टीचे युवा नेते तथा बऱ्हाणपूर येथील येथील उपसरपंच श्री गणेश लांडे यांनी दिनांक २२. रोजी सोमेश्वर मंदिरालगत बिंदुसरा नदीपात्रातील घाण व पाण्यास अडथळा ठरत असणाऱ्या वेगवेगळ्या वनस्पती काढून बिंदुसरा नदीचे संवर्धन करण्याचे काम हाती घेतले असून त्याचे आज बिंदुसरा नदीपात्रामध्ये नारळ फोडून कामाचे सुरुवात करण्यात आली यामध्ये या कामासाठी दोन जेसीबी मशीन तसेच दहा ट्रॅक्टर च्या साह्याने हे काम अतिशय युद्ध पातळीवर चालू असून यामागील हेतू हा आहे की शहरालगत व शहरातून जात असलेल्या बिंदुसरा नदी पात्रामध्ये शहरांमधील कचरा प्लास्टिकच्या पिशव्या ह्या फार मोठ्या प्रमाणामध्ये फेकल्या जात असून यामुळे नदीचे आरोग्य पूर्णपणे धोक्यात आल्यामुळे शहरवासीयांच्या आरोग्याला देखील हानी पोहोचत असून



शहरांमध्ये फिरणारे मोकाट जनावरे हे देखील नदीपात्रातील प्लास्टिकच्या पिशव्या खाऊन त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे म्हणून नदीचे संवर्धन व्हावे मोकाट जनावरांचे देखील आरोग्य धोक्यात जाऊ नये आणि शहरवासीयांना देखील कुठली हानी पोहोचू नये म्हणून गणेश लांडे यांनी हाती घेतलेला हा उपक्रम या कार्यक्रमाचे नारळ फोडून सुरुवात करताना या ठिकाणी उपस्थित भारतीय जनता पार्टीचे जिल्ह्याचे सरचिटणीस श्री देविदास नागरगोजे सर जिल्हा परिषद चौसाळा गटाचे सदस्य श्री अशोकजी लोढा साहेब भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते श्री नवनाथ अण्णा शिराळे भारतीय जनता पार्टीचे नेते श्री विक्रांत भैय्या हजारी तसेच भारतीय जनता पार्टीचे सोशल मीडिया प्रमुख राजू शहाणे नाथापूरचे सरपंच श्री सुंदरराव चव्हाण तसेच जिल्हा परिषदेच्या माझे अध्यक्ष मीराताई गांधले संध्याताई रजपूत श्री गणेश तोडेकर सिद्धेश्वर क्षीरसागर, श्री घोलप मामा श्री केशवजी बडे, श्री परमेश्वर डोईफोडे एडवोकेट श्री दबडे साहेब हे उपस्थित होते.

# सर्जेराव हतागळे यांचे निधन

बीड | प्रतिनिधी



तालुक्यातील हिवरसिंगा येथील कोतवाल सर्जेराव केशव हतागळे यांचं वयाच्या ८६ व्या वर्षी अल्पशा आजाराने (दि.२०) रविवार रोजी सायंकाळी निधन झाले. ग्रामपंचायत कर्मचारी लक्ष्मण हातागळे यांचे ते वडील होते. त्यांचा अंत्यविधी (दि.२१) सोमवार रोजी सकाळी ९ वाजता हिवरसिंगा येथे करण्यात आला. त्यांच्या पाश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी नातवंडे असा परिवार आहे. हतागळे कुटुंबाच्या दुःखात दैनिक आरंभ परिवार सहभागी आहे.

पान १ वरून...

## रमेश आडसकरांनी बांधली अजित दादांच्या पक्षाची घड्याळ हाती..!

मिळणार असल्यामुळे राजकीय उलथा पालक होण्याची शक्यता आहे. तसेच संघटनात्मक बदल घडून येणार असल्याचे दिसून येत आहे. सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन चालणारा सर्वसमावेशक चेहरा तळागाळात घट्ट पकड असलेला नेता म्हणून त्यांची आजपर्यंत ख्याती आहे. याचाच नेमका फायदा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षाला निश्चितपणाने होऊ शकतो. त्यामुळे नवीन चेहरा म्हणून जिल्हा अध्यक्ष पद रमेश आडसकर यांच्याकडे येण्याची दाट शक्यता आहे. आणि असे जर झाले तर निश्चित येणाऱ्या काळामध्ये याचा फायदा राजकीय समीकरणे बदलण्यामध्ये होईल.

**रमेश आडसकरांची पंकजा मुंडेंचे समर्थक म्हणून ओळख!**

रमेश आडसकर यांची मंत्री पंकजा मुंडे यांचे समर्थक म्हणून ओळख आहे. विधानसभेवेळी त्यांनी तिकिटासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवारांच्या पक्षांमध्ये प्रवेश केला होता. त्यांना माजलगाव आतून उमेदवारी देण्याचा शब्द दिला होता. मात्र, ऐनवेळी मोहन जगताप यांना उमेदवारी जाहीर केली होती. रमेश आडसकर यांनी २०१९ मध्ये भाजपाकडून माजलगाव मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. या ते अवघ्या काही मतांनी पराभू झाले होते. रमेश आडसकर यांची ओळख मंत्री पंकजा मुंडे यांचे निकटवर्तीय व कट्टर समर्थक म्हणून होती. रमेश आडसकर यांनी आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या पक्षात जाण्याचा निर्णय घेतला आहे.

**बीड नगरपालिकेतील भ्रष्टाचाराने बरबटलेला लेखापाल....**

मोठा घोटाळा केलेला आहे. लेखापाल गणेश पगारे यांनी स्वतःचेच पाप झाकण्यासाठी लोकप्रतिनिधीनी कॉलवर मला धमकवले असा आरोप करत बीडच्या विद्यमान आमदारावर गुन्हा दाखल केला. लोकांची सेवा करणाऱ्या लोकप्रतिनिधी वर जर भ्रष्ट अधिकारी गुन्हा नोंदवत असतील तर सर्वसामान्य न्याय कोणाकडे मागायचा? असा प्रश्न निर्माण झाला होता मात्र गणेश पगारे यांच्या निर्लज्ज कारभाराच्या तक्रारी असताना देखील त्या पगारेंचे धाडस वाढतच होते. या मागचा खरा मास्टरमाइंड कोण? हे शोधणे गरजेचे आहे नगरपालिकेच्या लेखापाल यांची बदली करण्यात आली आहे परंतु त्यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कारवाई होणे तितकेच गरजेचे आहे.

# तुमची मुलगी मला द्या म्हणत शिक्षकाला गाव गुंडाकडून मारहाण
## बंदुकीचा धाक दाखवत मारहाण ट्रॅक्टर घातलं गाडीवर

बीड | प्रतिनिधी



बीडच्या केज तालुक्यातील वरपगाव येथील एका विद्यालयासमोर धक्कादायक प्रकार घडला आहे. तुमची मुलगी मला द्या म्हणत शिक्षकालाच एका गावगुंडाने जबर मारहाण केल्याची घटना घडली. विशेष म्हणजे हा सर्व प्रकार बंदुकीच्या धाकावर करण्यात आला आहे.

यानंतर याच शिक्षकाच्या गाडीवर ट्रॅक्टर घालत मोठे नुकसान देखील केलं. बाजीराव डोईफोडे असे या शिक्षकाचे नाव असून आता या शिक्षकावर बीडच्या खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणात अद्याप पोलिसात गुन्हा दाखल झालेले नाही.

# बारावीनंतरच्या करिअर निवडीसाठी: JEE, NEET, MHT CET साठी तज्ज्ञ काउंसलिंग (मार्गदर्शन) ठरते अत्यावश्यक

बीड, २१/०४/२०२५: बारावीनंतर विद्यार्थ्यांच्या आयुष्यात करिअर निवडीचा टप्पा अत्यंत महत्त्वाचा असतो. योग्य दिशा न मिळाल्यास किंवा छोट्या चुका झाल्यास त्याचा परिणाम पुढील आयुष्यावर होऊ शकतो. विशेषतः JEE, NEET, आणि MHT CET सारख्या स्पर्धा परीक्षांनंतर अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश घेताना प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची असते. अशा वेळी तज्ज्ञ काउंसलिंगचे महत्त्व अनमोल ठरते.

जेईई अँडव्हान्स मध्ये अखिल भारतीय रँक ८८ मिळवणारे आणि आता बीड व छत्रपती संभाजीनगर येथे अर्जुना करिअर काउंसलिंग नावांनी, काउंसलिंग केंद्रे चालवणारे इंजि.कृष्णा नागरगोजे सर यांचा अनुभव यावर प्रकाश टाकतो त्यांच्या मते, प्रवेश प्रक्रियेच्या ऐन मध्यभागी अनेक विद्यार्थी गोंधळून जातात-सीट अलॉटमेंटचे नियम, आवश्यक कागदपत्रे तयार करणे आणि विविध आरक्षणांचा लाभ कसा घ्यावा याबाबत त्यांना पुरेशी स्पष्टता नसते अशा नाजूक प्रसंगी तज्ज्ञांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना योग्य आणि निर्णायक पाऊल उचलण्यास मदत करते.

जेईई साठी जोसा (JOSAA) काउन्सेलिंगमध्ये सहा राऊंडस् आणि सीसाब चे दोन स्पेशल राऊंड, नीट साठी एमसीसी (MCC) मध्ये तीन पुनर्रवर्ती राऊंडस् (स्ट्रे व्हॅकंसी राउंडसह) आणि महाराष्ट्रा-सीईटी साठी CAP (Centralized -dmission Process) मध्ये तीन अधिकृत राऊंडस् होतात. या अनेक टप्प्यांमुळे आणि बदलत्या नियमांमुळे विद्यार्थी सहज गोंधळू शकतात यावेळी योग्य मार्गदर्शनामुळे या सर्व टप्प्यांची पारदर्शक समज मिळते आणि प्रक्रिया सुलभ होते.

सक्षम काउंसलिंगद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या मेरिटनुसार JoSAA, MCC च्या राष्ट्रीय स्तरावरील सेंट्रल काउन्सेलिंग, तसेच महाराष्ट्र राज्यातील MHT-CET साठी CAP ची प्रक्रिया सविस्तर समजावून सांगितली जाते विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणांनुसार शासकीय, खाजगी व निमशासकीय महाविद्यालयांमध्ये सीट




कशा मिळतील, तसेच स्पॉट राउंड (Spot Round) व मॉप-अप राउंड (Mop-up Round) मधून अतिरिक्त संधी कशी मिळू शकते, हे स्पष्ट केले जाते. आवश्यक मूळ कागदपत्रांची बारकाईने पडताळणी कशी करावी आणि जात, EWS, PWD व सैनिक आरक्षणासाठी लागणारी कागदपत्रे व त्यांचा लाभ घेण्याची प्रक्रिया यावरही नेमके मार्गदर्शन मिळते, ज्यामुळे भविष्यातील कायदेशीर अडचणी टाळता येतात.

केवळ प्रवेश प्रक्रियाच नव्हे, तर विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व व कौशल्ये ओळखून त्यांना अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय व्यतिरिक्त नाविन्यपूर्ण करिअर पर्याय सुचवले जातात. विविध डिग्री, डिप्लोमा व व्यावसायिक कोर्सेसची माहिती, त्यांची पात्रता, फी स्ट्रक्चर व त्या क्षेत्रातील करिअरची संधी याविषयी सविस्तर माहिती पुरवली. यासोबतच, काउन्सेलर विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याची काळजी घेतात त्यांचा आत्मविश्वास वाढवतात आणि प्रक्रियेतील तणाव कमी करण्यासाठी मानसिक आधार देतात. JEE, NEET, MHT-CET सह UPSC, MPSC अशा इतर स्पर्धा परीक्षांसाठी अभ्यासक्रम आखणी, वेळापत्रक तयार करणे व प्रभावी रणनीती याबाबतही मार्गदर्शन केले जाते. या संपूर्ण प्रक्रियेत पालकांनाही सहभागी करून घेतले जाते, ज्यामुळे त्यांना आपल्या मुलाच्या निर्णयांची खात्री पटते.

थोडक्यात, बारावीनंतरचे योग्य काउंसलिंग हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक वाटचालीसाठी एक भक्कम पाया ठरते. हे मार्गदर्शन केवळ प्रवेशाचा मार्ग सुकर करत नाही, तर विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याची दिशा निश्चित करून त्यांना त्यांच्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी निर्णायक मदत करते. त्यामुळे, या महत्त्वाच्या टप्प्यावर तज्ज्ञ काउंसलिंगचा लाभ घेणे विद्यार्थ्यांसाठी अत्यंत हिताचे ठरते.

इंजि.कृष्णा नागरगोजे
JEE -DV-NCE -IR 88 && RGIPT QU-LIFIED
(B.tech CSE, NIT PATNA)
संस्थापक: अर्जुना एज्युकेशनल ग्रुप
संचालक: अर्जुना करिअर काउंसलिंग
बीड, छ.संभाजी नगर
७५५८७३७३५६ / ९५७७८५१२१२

# वनविभागाला दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतरच

# कोरडेठाक पाणवठ्यात पाणी सोडण्यासाठी जाग येते का?

लिंबागणेश । प्रतिनिधी

ऐन उन्हाळ्यात पाण्याअभावी वन्यजीवांचे हाल सुरू असल्याचे गंभीर चित्र पहायला मिळते. वनविभागाकडून वन्यप्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. दिवसेंदिवस उन्हाचा पारा चढत असुन वन्यप्राण्यांची पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती सुरूच असुन त्यांची होणारी ससेहोलपट पाहता वनविभागाने बांधलेल्या कृत्रिम पाणवठ्यात नियमितपणे पाणी सोडावे हि वन्यप्रेमींची अपेक्षा असते. मात्र वनविभागाला याचे गांभीर्य नसुन सामाजिक कार्यकर्ते यांनी तक्रार केल्यानंतर आणि याबाबत विविध दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतरच वनविभागाला जाग येते आणि दुसऱ्या दिवशी कोरडयाठाक पाणवठ्यात पाणी सोडले जाते. त्यामुळे दरवर्षी उन्हाळ्यात सामाजिक कार्यकर्ते यांच्या तक्रारी व दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतरच जाग येते का? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

बीड तालुक्यातील करचुंडी वनक्षेत्रांतर्गत बेलगाव, पिंपरनई, फुकेवाडी, सोमनाथवाडी लगत असलेल्या वनक्षेत्रात हरिण, मोर, लांडोर, वानर आदि वन्यजीव वास्तव्य करतात. वनक्षेत्रातील कृत्रिम पाणवठे कोरडेठाक पडल्याने तहानलेले वन्यजीव मानवी वस्ती कडे धाव घेत असल्याचे चित्र दिसून येते.काही ठिकाणी कृत्रिम पाणवठे कोरडेठाक तर काही ठिकाणी महिनाभरापूर्वी सोडलेल्या पाण्यात मोठ्या प्रमाणात शेवाळ साचल्याने पाणी पिण्यास योग्य नाही. त्यामुळे वनविभागाने कृत्रिम पाणवठ्यात नियमित पाणीपुरवठा करून शेवाळ साचलेल्या ठिकाणी स्वच्छता करून पिण्यायोग्य पाणी वनविभागाने उपलब्ध करून द्यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी २ दिवसांपूर्वी केली होती. याविषयी विविध दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यानंतर वनविभागाला जाग आली आणि त्यांनी पाणवठ्यात पाणी सोडले. साचलेल्या शेवाळाची साफसफाई केली.


सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ
मुख्य संपादक दीपक थोरात – मो.9860898564

वनक्षेत्रातील पाणवठे कोरडेठाक; तहानलेल्या वन्य प्राण्यांची मानवी वस्तीकडे धाव

रस्त्यालगत पाणवठे असल्याने अपघाताचे प्रमाण वाढले : डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी

सध्या उन्हाचा पारा वाढत असल्याने बाष्पीभवनाचा वेग आधिकच वाढला असून परीणामी साठवण तलाव आणि धरणाच्या पाण्याने तळ गाठला असून बीड तालुक्यातील करचुंडी वनक्षेत्र अंतर्गत बेलगाव, पिंपरनई, फुकेवाडी, सोमनाथवाडी, लगत असलेल्या वनक्षेत्रातील हरिण, मोर, लांडोर, वानर आदी वन्यजीव वनक्षेत्रातील कृत्रिम पाणवठे कोरडेठाक पडल्याने गाव तलावाकडे धाव घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे. काही वर्षांपूर्वी पोखरी (घाट) येथील गावतलावावर पाण्याच्या शोधार्थ आलेल्या लांडोराचा कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात मृत्यु झाला होता.

वनविभागाने कृत्रिम पाणवठे तयार केले आहेत मात्र त्यात नियमित पाणी सोडण्यात येत नाही. महिनाभरापुर्वी सोडलेल्या पाण्यात मोठ्या प्रमाणात शेवाळ साचल्याने पाणी पिण्यास योग्य नाही. वनविभागाने वन्यप्राण्यांसाठी नियमित पाणवठ्यात पाणी सोडणे आवश्यक आहे. परंतु त्यात नियमितता नसल्याने काही पाणवठे कोरडेठाक तर काही पाणवठ्यात शेवाळ आढळून आले आहे. पिंपरनई शिवारातील पाणवठा रोडलगत बांधण्यात आला असुन रोडवरून जाणाऱ्या वाहनांच्या धडकेने वन्यजीव मृत्युमुखी पडल्याच्या दुर्दैवी घटना घडलेल्या आहेत. वनविभागाने नियमित वन्यप्राण्यांसाठी पाणवठ्यात पाणीपुरवठा करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

20 Apr 2025 - Page 3 | epaper.maharashtraaarambh.com
Powered by softisky | 9764331134




## पाणवठ्याच्या दुरूस्तीची गरज, तडे गेलेल्या पाणवठ्यात पाणी टीकत नाही

वन विभागामार्फत बांधण्यात आलेल्या कृत्रिम पाणवठ्यांची उन्हाळ्यापुर्वी देखभाल आणि आवश्यक त्याठिकाणी दुरूस्ती करण्याची आवश्यकता आहे. याकडे वनविभागाचे दुर्लक्ष असुन भेगा पडलेल्या, तडे गेलेल्या पाणवठ्याण पाणी टीकुन रहात नाही. वनविभाग वरून सिमेंट आणि वाळुच्या साह्याने भेगा बुजविण्याचा थातुरमातुर प्रयत्न करताना दिसत आहे. मात्र याचा फारसा उपयोग होताना दिसत नाही. त्यामुळे पाणवठा दुरूस्तीची कामे दर्जेदार करण्यात यावीत अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.




## जनता विद्यालयात पालक मेळावा संपन्न

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील धानोरा येथील जनता वस्तीगृह शिक्षण संस्थेचे जनता विद्यालयात येथे इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी रविवार दि.२० एप्रिल रोजी पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम जनता उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रशस्त इमारतीमध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमास धानोरा व परिसरातील सर्व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष सय्यद अब्दुलभाई, सचिव विजयकुमार (अण्णा) बांदल, व्यवस्थापक विशाल (भैय्या) बांदल, मुख्याध्यापक सय्यद युनूस, उपमुख्याध्यापक ढोबळे सर, पर्यवेक्षक सय्यद अय्युब सर, तसेच सर्व शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व गावातील अनेक प्रतिष्ठित पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार प्रास्ताविक पर्यवेक्षक श्री सय्यद अय्युब सर यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी गरजेच्या सुधारणा, दिशा–दशा आणि येणाऱ्या काळात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची सविस्तर अशी माहिती दिली.संस्थेचे व्यवस्थापक विशाल भैय्या बांदल यांनी पालकांना प्रेरणादायी मार्गदर्शन करून शाळेच्या वाटचालीबाबत सकारात्मक विचार मांडले. कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन पठाण सर यांनी तर उपस्थितांचे आभार श्री झांजे सर यांनी मानले. या कार्यक्रमास योगेश बेद्रे, ईश्वर शेळके, सतीश काळे, अजीम सय्यद, गणेश काळे, इलियास सय्यद, तुषार शेळके आदींसह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


डोईफोड वाडीत रंगला वडजाई देवीचा पालखी सोहळा उत्साही वातावरणात यात्रेस प्रारंभ हजारो भाविकांनी घेतला. पालखी सोहळ्याचा आनंद. (छाया तात्यासाहेब डोईफोडे)


## शिंदे–काळे परिवाराचा शाही विवाह सोहळा संपन्न

नेकनूर । प्रतिनिधी

नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे यांचे बंधू राहुल आणि नेकनूर येथील धर्मराज काळे सर यांची कन्या रिद्धी यांचा शाही शुभ विवाह सोहळा दि.२१ एप्रिल रोजी नेकनूर येथील श्री गणेश मंगल कार्यालयात संपन्न झाला. शिंदे आणि काळे परिवाराच्या गणगोतासह हजारोंच्या संख्येने आप्तेष्ट वधु–वरांना आशिर्वाद देण्यासाठी जमले होते.

शिंदे व काळे परिवाराचा नेकनूर व परिसरात मोठा नावलौकिक असल्यामुळे राहुल आणि रिद्धी च्या विवाह सोहळ्याला हजारोंचा जनसागर उपस्थित होता. या विवाहप्रसंगी बंकटस्वामी संस्थान चे मठाधिपती ह.भ.प लक्ष्मण महाराज मेंगडे, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष बबनराव गवते सरपंच–उपसरपंच संघटनेचे अध्यक्ष कुंडलीक खांडे, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, युवासेना जिल्हाप्रमुख रविराज बडे,बीड चे सिव्हिल सर्जन अशोक थोरात,अखिल भारतीय वारकरी मंडळाचे बीड जिल्हाध्यक्ष हरिदास जोगदंड, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शप) जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ देवगुडे, मा.जि.प.सदस्य नारायण शिंदे, खा.बजरंग सोनवणे यांचे चिरंजीव सौरव सोनवणे, मा.पंचायत समिती सदस्य अनिल जाधव, नेकनुर चे सरपंच सुंदर लांडगे, सि.ए भानुदास जाधव यांच्यासह नेकनूर व परिसरातील आजी–माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, राजकीय, सामाजिक व विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर वधूवरांना शुभाशिर्वाद देण्यासाठी उपस्थित होते.





राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा कन्हेरवाडी गावचे सरपंच राजेभाऊ फड यांच्या वतीने गावातील हनुमंत बालासाहेब मुंडे, गौतम संभाजी रोडे, वैजनाथ सोमीनाथ बहीरे, सुरेश बालासाहेब मुंडे यांच्या मुलींच्या विवाहासाठी प्रत्येकी दहा हजार रुपये आर्थिक स्वरुपाची मदत करण्यात आली. यावेळी से.स.सो. चेअरमन मिनीनाथ दादा फड, रामहरी फड, काँग्रेस नेते प्रकाश मुंडे, बंडू मुंडे, माधवराव मुंडे, गुंडीबा फड, बंडू फड, ग्रा प. सदस्य प्रल्हाद गित्ते, प्रशांत रोडे, बाबासाहेब मुंडे, तौफिक कच्छी, महादेव मामा मुंडे, समाधान मुंडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## बीडचे भूमिपुत्र भरत गिते यांची 'प्रासंगिक' कार्यक्रमात बीड आकाशवाणी केंद्रावर मुलाखत

बीड । प्रतिनिधी

उद्योग क्षेत्रात नवनवीन संकल्पना राबविणारे ल्युमिनियम मॅन बीड –परळीचे भूमिपुत्र उद्योजक भरत गित्ते यांची 'प्रासंगिक' कार्यक्रमात बुधवारी दि. २३ एप्रिल रोजी बीड आकाशवाणी केंद्रावर मुलाखत ऐकण्यासाठी प्रसारण होणार आहे. तरी सर्वानी जरूर ऐकावी असे आवाहन कारण्यात आले आहे.



स्वतःच्या कामाप्रती निष्ठावंत राहून प्रामाणिकपणाने ध्येय उराशी बाळगून यशाला गवसणी घालणे शक्य आहे. मात्र त्यासाठी निराशा झटकली पाहिजे. आपला दृष्टिकोन न्याय निवाडा करण्यापेक्षा सकारात्मक गोष्ट निवडण्यासाठीचा असावा. यातूनच कोणत्याही क्षेत्रात यश मिळू शकते. सर्वांसाठी प्रेरक होईल अशा पैलूंना उलगडून दिला आहे. परळीचा भूमीपुत्र असलेले उद्योजक भरत गिते यांनी एका आंतरराष्ट्रीय कंपनीचा प्रमुख म्हणून महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांबरोबर सामंजस्य करार केला. आशा अनेक उपयुक्त बाबी, विविध आणि चौफेर मुद्द्यांवर या मुलाखतीच्या माध्यमातून प्रासंगिक या कार्यक्रमात बीड–परळीचे भूमीपुत्र, भारताच्या परदेशी गुंतवणूकीचे सल्लागार, ज्यांना 'मॅन ऑफ अल्युमिनियम' म्हणून ओळखलं जातं असे भरत गिते यांची डॉ. संपदा कुलकर्णी यांनी मुलाखत घेतली आहे.

मुलाखत प्रसारण – बुधवार, दि. २३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता आकाशवाणी (१०२.९ चक्र)बीड केंद्रावर होणार आहे. यासाठी लाईव्ह स्ट्रीमिंगवर ऐकण्यासाठी डाउनलोड करा, छ्शुीपरळी हे मोबाईल ऍप्लिकेशन. * Android App - https://play.google.com/store/apps/details?id=com.parsarbharti.airnews * IoS App - https://apps.apple.com/in/app/newsonair/id1450030867 * Web Link - https://akashvani.gov.in/radio/live.php?channel=164 यावर ऐकण्या साठी प्रसारित होणार आहे. तरी सर्वांनी ही मुलाखत जरूर ऐकावी असे आवाहन करण्यात आले आहे.

## साक्षी कांबळे हिच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या आरोपीला फाशी ची शिक्षा द्या : नितीन सोनवणे

बीड । प्रतिनिधी

बीड शहरामध्ये के एस के कॉलेजमधील शिकणारी मुलगी साक्षी कांबळे मृत्यू जबाबदार असणाऱ्या नराधमास फाशीची शिक्षा देण्यात यावी, बीड मधील के, एस, के महाविद्यालयातील मुली सुरक्षित नाहीत, मुलींचे शोषण करणारे रॅकेट एक्सपोज झाले पाहिजे. साक्षी कांबळे ला न्याय मिळाला पाहिजे. यासाठी ऑल इंडिया पँथर सेनेच्या



वतीने दिनांक २३/०४/२०२५ रोजी ठीक ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय दीपक भाई केदार यांच्या उपस्थितीमध्ये व बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांच्या नेतृत्वामध्ये आक्रोश न्याय आंदोलन करण्यात येणार आहे.

तरी सर्व कार्यकर्ते पदाधिकारी व समाज बांधव यांनी संख्येने उपस्थित राहावे, असे आव्हान नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना बीड यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून राष्ट्रीय दर्जाचे कलाकार निर्माण व्हावेत : ॲड सर्जेराव तांदळे

### आदर्श गाव वंजारवाडी येथे मातोश्री विद्यालय जि.प.शाळा व अंगणवाडी चे स्नेहसंमेलन थाटात संपन्न

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील आदर्शगाव वंजारवाडी येथिल छत्रपती शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मातोश्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जि.प.प्रा.शाळा व अंगणवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सर्जेराव तात्या तांदळे म्हणाले की, सांस्कृतिक कार्यक्रमातुन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. ग्रामिण भागातील मुलांना संधी मिळते. वंजारवाडीचे विद्यार्थी हे जागतिक दर्जाचे बनले पाहिजेत.




यावेळी सर्वप्रथम सरस्वती मातेचे पुजन करुण कार्यक्रम सुरु करण्यात आला. कार्यक्रमाला विशेष उपस्थिती मा.श्री.वैजिनाथ नाना तांदळे, मा.श्री. मुरलीधर बप्पा ढाकणे यांची होती. त्यांणी सर्वांना मार्गदर्शन केले. सोमिनाथ सर, भास्कर दादा, सचिन तांदळे सर, दयावान सर यांणी मनोगते व्यक्त केली. यावेळी मान्यवरांना शाळेची जुनी परिस्थिती व आताची भव्यदिव्यता यावर भाष्य केले. एकेकाळी जि.प. शाळा मोडकळीस आली होती. शाळेचा पट हा पाच विद्यार्थ्यावर आला होता. त्यावर तात्या नाना यांणी परिश्रम घेवुन हा पट खुप मोठ्या प्रमाणात वाढवुन शाळेला भव्य दिव्य स्वरुप प्राप्त करुण दिले. गावात पुढील शिक्षणाची सोय नव्हती म्हणुन मा. सर्जेराव तात्या याणी मातोश्री विद्यालयाचा स्थापना करुण मुलांच्या शिक्षणाची सोय केली. शिक्षणाच्या प्रवाहात आल्याने माणसाला आयुष्य जगण्याचे सुकर होते.

सध्याच्या या आधुनिक काळात आपल्याला आपल्या परिसरातील विद्यार्थ्यांसोबत नव्हे तर परदेशातील मुलांसोबत स्पर्धा करायची आहे त्यामुळे सर्वांनी अभ्यासाकडे लक्ष देणे गरजेचे शाळेत शिक्षक वृंद जेवढे विद्यार्थ्यांकडे लक्ष देतात त्याचप्रमाणे पालक वर्गानेही आपल्या मुलाकडे वैयक्तिक लक्ष देणे गरजेचे आहे. सध्याचे युग हे आधुनिकतेने आणि तंत्रज्ञानाने विकसित होत चालले आहे त्यामुळे आपल्याला जगासोबत चालण्यासाठी शिक्षण घेणे गरजेचे आहे. तात्या आणि नाना यांच्या परिश्रमामुळे वंजारवाडी गाव हे शिक्षणाच्या प्रवाहात आले. एकंदरितच कार्यक्रम अतिशय सुंदर झाला.

विद्यार्थ्यांचे ग्रामस्थांणी टाळ्या वाजवुन कौतुक केले. देशभक्तीमय वातावरण गावात निर्माण झाले. मातोश्री विद्यालयाचा पुर्ण स्टाफ, भारती मॅडम, नागरगोजे मॅडम, अंगणवाडी ताई यांचेही ग्रामस्थाने या यशस्वी कार्यक्रमासाठी आभार मानले.

यावेळी गावातील ग्रामस्थांनी आलेल्या पाहुण्यांना व पालक वर्ग या सर्वांना चहा पाण्याची सोय केली होती. यावेळी श्री लक्ष्मण पवारसाहेब, सोमिनाथ तांदळे सर, समाजसेवक राख नाना, सचिन तांदळे सर, लक्ष्मण तांदळे सर, दयावान सर, शहादेव नाना, महादेव दादा, यादव भाऊ, दिनकर पाटील, शिवाजी नागरगोजे, अंकुश आण्णा, भास्कर दादा, बाबासाहेब दादा, अशोक धुरंधरे, आप्पा पवळ, सुनिल पवळ, दासु सातपुते, अमर सानप, विशाल खाडे, ओमकार उबाळे, सचिन तिप्पटे, पटाईत आण्णा, ओमकार कांबळे, विठ्ठल आप्पा, सोपान तात्या, अंगद महाराज, यासह संपुर्ण गावकरी, महिला भगिणी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# जैताळवाडी मधील पेव्हर ब्लॉकचा रस्ता आठ दिवसात झाला खराब

## तक्रार केली म्हणुन इंजिनियर ला पत्रकारांची ऍलर्जी

बीड । प्रतिनिधी

अनेक वर्षांपासून जैताळवाडी गाव हे विकासापासून दूर होते. परंतु नवनिर्वाचित सरपंच तरुण असल्यामुळे गावची चांगली कामे होतील अशी अपेक्षा गावकऱ्यांची होती परंतु फक्त नावालाच सरपंच असलेल्या सरपंच वडील यांनी गावच्या कामात खूप भ्रष्टाचार केला. निकृष्ट दर्जाची कामे सरपंच वडील पाहायला करताना मिळतात. जैताळवाडी गावामध्ये बाबुराव केसकर यांच्या घरापासून ते हरिभाऊ आमटे यांच्या घरापर्यंत गेल्या आठ ते पंधरा दिवसांपूर्वी बनवण्यात आलेल्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे पाहायला मिळाले.

आठ दिवसांमध्येच रस्त्याचे पेव्हर ब्लॉक कुठले गेले आहेत. तसेच साईट पट्टा हा सिमेंटचा असल्यामुळे तो पूर्णपणे बाजूला निघून गेलेला आहे. संबंधित पेपर ब्लॉकचे काम इंजिनियर आणि सरपंच वडील यांच्या हात मिळूनीमुळे बोगस आणि निकृष्ट दर्जाचे झाले असल्याची चर्चा सध्या ग्रामस्थ करीत आहेत. अनेक गावकऱ्यांनी रस्ता चांगला व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे परंतु सरपंच वडील त्याला दुर्लक्ष देताना पाहायला मिळतात. फक्त सरपंच म्हणून निवडून आलेले फक्त नावाला सरपंच आहेत की काय अशी सुद्धा चर्चा गावांमध्ये पाहायला मिळत आहे ? या रस्त्यात खूप मोठा भ्रष्टाचार झाले असल्याची चर्चा ग्रामस्थ करीत असल्याचे पाहायला मिळाले. संबंधित पेव्हर ब्लॉग चे काम दहा लक्ष रुपयाचे असून ते ७० ब्रास एवढे करावे लागते परंतु काम हे फक्त ६० ब्रास च्या आसपास झालेले आहे अशी प्रतिक्रिया यावेळी गावकऱ्यांनी दिली.

संबंधित इंजिनियर यांना फोनवरून संपर्क साधला असता त्यांनी सुद्धा याकडे दुर्लक्ष दिलेल्या आहे. संबंधित इंजिनियर यांना तक्रार ऐकून घेण्यासाठी पत्रकारांची सुद्धा एलर्जी आहे की काय ? संबंधित इंजिनिअर यांना संपर्क न झाल्यामुळे त्यांना व्हाट्सअप वरती मेसेज केला परंतु त्यांनी पत्रकारांचा मेसेज आल्याचे थेट सरपंच वडील यांना सांगितले आणि सरपंच वडील यांनी गावातील काही प्रमुख लोकांना सांगून पत्रकारांना धमकवण्याचा सुद्धा प्रयत्न केला. संबंधित सुरू असलेले पेव्हर ब्लॉग चे काम हे इंजिनियर आणि सरपंच वडील यांच्या संगनमताने सुरू असून यामध्ये खूप मोठा भ्रष्टाचार सुरू असल्याचा म्हटले जात आहे.



**बी.डी.ओ वानखेडे साहेब पत्रकाराला धमकी आली सांगुन पण तुम्ही याकडे दुर्लक्ष करताय..**

रस्त्याची बातमी करण्या अगोदर संबंधित असणाऱ्या इंजिनिअर यांना व्हॉट्सॲप द्वारे सगळी माहिती ही देण्यात आली होती. परंतु या मध्ये सरपंच वडील आणि इंजिनियर यांची हातमिळवणूक झाली की काय असे प्रश्न निर्माण होत आहेत. या प्रकरणामध्ये गटविकास अधिकारी वानखेडे साहेब संबंधित इंजिनिअर यांची चौकशी करून इथुन पाठीमागे झालेल्या फाईल मंजूर तसेच अनेक योजनांवर खरच सरपंच असणाऱ्या व्यक्तीच्या सह्या आहेत का ? याची पडताळणी करावी कारण की सरपंच असणारे हे बाहेर असतात आणि कारभार हा त्यांचे वडिलच हाकतात.

### चहा पेक्षा किटली गरम

सरपंच एक आणि कारभार हाकतात एक वेळ आली तर सरपंच असणाऱ्यांचे लोकेशन सुद्धा चेक करावे कारण फाईलवर वर सह्या होतात बीड मधे आणि सरपंच असतात पुण्यात मग याकडे संबंधित अधिकारी दुर्लक्ष करतात. पाठीमागच्या काळात अश्याच बातम्या लागल्या नंतर एक पत्रकाराने सरपंच असणाऱ्या फोन लावला तर सरपंच वडील यांनी सांगितले की मी इथे असताना त्याला फोन लावायची काय गरज आहे.

### बातमी लावली म्हणुन तोंडे नामक व्यक्तीकडून पत्रकाराला धमकावण्याचा प्रयत्न...

इंजिनीयर यांना व्हॉट्सॲप द्वारे तक्रार केल्या नंतर इंजिनिअर यांनी सरपंच वडील यांना सांगितले की एका पत्रकाराचा मेसेज आले आहेत. संबंधित पेव्हर ब्लॉक रस्त्याचे काम निकृष्ट झाले आहे. लगेच इंजिनियर यांनी सरपंच वडील यांना सांगितले. सरपंच वडील यांनी तोंडे नामक व्यक्तीला सांगुन धमकावण्याचा प्रयत्न केला. तु माझी भेट घे, तुला बगून घेतो, बातमी लावायची नाही अश्या प्रकारे पत्रकाराला तोंडे नामक व्यक्तीने धमकावण्याचा प्रयत्न केला आहे. सरपंच वडील आणि तोंडे नामक व्यक्तीचा आणि इंजिनियर यांची चौकशी करावी अशी मागणी पत्रकार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे

### मुलगा सरपंच तर बाप हाकतो गावचा कारभार..

बीड तालुक्यातील जैताळवाडी येथील अगदी कमी वयामध्ये सरपंच झालेले हनुमान केसकर पुणे या ठिकाणी शिक्षण घेतात तर गावचा कारभार हे हनुमान केसकर यांचे वडिलच हाकतात असे चित्र स्पष्ट होताना पहायला मिळत आहे.



## बीड येथे मुख्यमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत पोलीस परिवार अस्तित्व मेळावा संपन्न होणार

बीड । प्रतिनिधी

आज नारळी सप्ताहासाठी घाटशीळ पारगाव तालुका शिरूर कासार जिल्हा बीड येथे राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब आले होते राज्याच्या पोलिस परिवाराच्या पाठीशी खंबीर उभा असणारा पालकत्व असणारे माननीय मुख्यमंत्री पोलिसांच्या अनेक प्रश्नांसाठी माननीय मुख्यमंत्री यांना विनंती केली की पोलीस परिवार अस्तित्व मेळावा घ्यायचा आहे. साहेबांनी तात्काळ म्हणजे पोलिसांच्या अडचणी सोडवण्यासाठी जून महिन्यामध्ये बीड येथे मी येतो येत्या जून महिन्यामध्ये महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना अंतर्गत महाराष्ट्र पोलीस परिवार अस्तित्व मिळावा संपन्न होणार आहे.

या मेळाव्यात महाराष्ट्र पोलीस, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी कर्मचारी, जेल पोलीस, होमगार्ड, एस आर पी एफ पोलीस, रेल्वे पोलीस, महाराष्ट्र पोलीस क्लॅरिकल संघटना, महाराष्ट्र पोलीस भरती प्रशिक्षण अकॅडमी, एमपीएससी स्पर्धा परीक्षा संघटना, पोलीस भरती करणारे तमाम युवक, महाराष्ट्रातील अनेक बेरोजगार युवक आणि अनेक सामाजिक संघटना मिळून बीड येथे भव्य दिव्य माननीय मुख्यमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये जून महिन्यात बीड शहरात पोलीस परिवार अस्तित्व मेळावा संपन्न होणार आहे तारीख लवकरच कळवली जाईल या मेळाव्यात पोलीस अधिकारी कर्मचारी यांना भेडसावणाऱ्या मोफत आरोग्य सुविधा आणि हक्काचे घर अनेक प्रश्न सेवानिवृत्त पोलीस अधिकारी कर्मचारी यांना मोफत आरोग्य सुविधा पोलीस पाल्य आरक्षण, अनुकंप तीन अपत्य, एस आर पी एफ पोलीस यांची जिल्हा बदली, जेल पोलीस पाल्यांना आरक्षण व जेल पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र पोलिसांप्रमाणे अधिकार, होमगार्ड सैनिकांना ३६५ दिवस रोजगार, पोलीस भरती करणाऱ्या युवकांसाठी दरवर्षी पोलीस भरती काढणे, प्रलंबित असणारे पोलिसांचं डीजे लोन गृह अग्रीम लोन मंजूर करून दरवर्षी यादी निघावी, सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगार, वय निघून गेलेल्या पोलीस पाल्यांना सामान्य युवकांना शासनाने रोजगार उपलब्ध करून द्यावा, पोलीस खात्या अंतर्गत असणारे क्लर्क संघटना यांचे विविध प्रश्न अशा अनेक प्रश्नांची साकडे माननीय मुख्यमंत्र्यांकडे मांडून शासकीय निमशासकीय अनेक संघटनेचे प्रश्न या अस्तित्व मेळाव्या मधून मांडून हे माननीय मुख्यमंत्र्यांकडून मान्य करून घ्यायचे आहे तरी सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्यासाठी व आपापल्या तालुक्यात शहरात जिल्ह्यात राज्यात बैठका घेऊन हा अस्तित्व मिळावा कुठल्या राजकीय पक्षाचा नसून पोलीस परिवार घेतोय या हिशोबाने कामाला लागायचे तारीख लवकरच सर्वांना कळवतो तुमचाच राहुल अर्जुनराव दुबाले संस्थापक अध्यक्ष, महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना, तथा महाराष्ट्र शासन गृह विभाग पोलीस निराकरण समन्वय समिती सदस्य.




## प्रशासनाचे व शासनाचे डोके ठिकाणावर आहे काय..?

### बीड शहर बचाव मंचाचा संतप्त सवाल

**बीड शहराला विमानतळापेक्षा, रोजगाराची आणि पाण्याची जास्त गरज आहे**

बीड । प्रतिनिधी

काल दि.२१ रोजी बीड शहर बचाव मंचाने जिल्हाधिकारी कार्यालया समोर नगर रोड वर चालु असलेल्या रस्ता दुभाजकाच्या निर्माण कामा मध्ये आवश्यक त्या सर्व ठिकाणी शासकीय कार्यालयान समोर सर्वसामान्य जनतेच्या सोयी साठी यू 'टर्न ठेवण्यात यावेत व बीड शहराला तात्काळ सुरळीत पाणीपुरवठा शक्य त्या सर्व मार्गाने चालु करावा या मागण्यांसाठी आक्रमक होऊन घोषणाबाजी करीत जोरदार आंदोलन केले.

या ठिकाणी प्रशासनाचे व शासनाचे डोके ठिकाणावर आहे काय..?.. बीड शहर बचाव मंचा ने असा संतप्त सवाल विचारात नगर रोड वर यू 'टर्न तात्काळ देण्यात यावेत तसेच शहराला शक्य त्या सर्व मार्गाने तात्काळ पाणीपुरवठा सुरू करण्यात यावा, नेत्यांच्या खाऊ खादाड वृत्ती मुळे रखडलेल्या धानोरा रोड चे तात्काळ पावसाळ्या च्या आधी निर्माण करण्यात यावे, शहरात पावसाळा पूर्व तयारी सुरू करण्यात यावी, शहरातील भरधाव वेगवाण वाहनांना नियंत्रित करण्यासाठी पाउले उचलावीत, नगर रोड व शहराला जोडलेल्या सर्वच रस्त्यांवर आणि शहरात नागरिकां च्या सोयी साठी बस थांबे पिक-अप शेड, अद्यावत पाण्याच्या सोयीने युक्त स्त्री- पुरूष स्वच्छतागृह बांधण्यात यावेत यासह आदी अनेक महत्वाच्या मागण्यांचे निवेदन मा.जिल्हाधिकारी यांना देऊन वेळ पडलीच तर जिल्हाधिकारी आणि मंत्रांच्या ही गाडचा आडऊत असा गंभीर आंदोलनाचा स्पष्ट शब्दात ईशारा दिला.

यावेळी जनतेच्या गरजा काय आहेत, ओरड काय आहे आणि प्रशासन व शासन काय करत आहे, सर्व सामान्य माणसांच्या मागण्या कोणी ऐकायलाच तयारच नाही.. शासन व प्रशासनाचे डोकेच ठिकाणावर आहे काय...? असा संतापजनक सवाल बीड शहर बचाव मंचाने विचारला आहे. हे आंदोलन करताना, कॉ.डि.जी. तांदळे सर, जेष्ठ समाज सेवक नितीनजी जायभाये, कॉ.भाऊराव प्रभाळे, ॲड. अनिल बारगजे, ॲड. नितीन वाघमारे, कॉ. सुधीरभाऊ देशमुख, जेष्ठ समाज सेवक डॉ. संजय तांदळे, जेष्ठ समाज सेवक अशोकराव येडे, स.से. बाजीराव ढाकणे, रामधनभाऊ जमाले, हाफिज मैनुद्दीन शेख शहर काझी, सादेकभाई सय्यद, पत्रकार नितेश उपाध्ये, समाज सेविका किशकिन्दाताई पांचाळ, डॉ. गणेश ढवळे, यांच्यासह बीड शहर बचाव मंचाचे अनेक संघर्ष योद्धे उपस्थित होते.

## जाधव परिवाराला साने गुरुजी कर्मचारी कल्याण मंडळाची मदत

गेवराई । प्रतिनिधी

जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचेकर्मचारी स्वर्गीय सुरेश जाधव यांच्या परिवाराला साने गुरुजी कर्मचारी कल्याण मंडळाच्या वतीने आर्थिक मदतीचे वाटप शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या हस्ते करण्यात आले.



जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अमरसिंह पंडित यांच्या संकल्पनेतून जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांना विविध आजारात मदत केली जाते तसेच सेवेत निधन झालेल्या कर्मचाऱ्यांच्या परिवारालाही आर्थिक मदतीचे वाटप करण्यात येते. जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय रामपुरी येथील पर्यवेक्षक जाधव सुरेश भिमराव यांचे अल्पशा आजाराने निधन झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबाला साने गुरुजी कर्मचारी कल्याण मंडळ गेवराई कडून आर्थिक मदतीसाठी एक लाख रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला. शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या हस्ते आर्थिक मदतीचा धनादेश जाधव परिवाराला देण्यात आला. यावेळी साने गुरुजी कर्मचारी कल्याण मंडळाचे अध्यक्ष भागवतराव राऊत, मंडळाचे व्यवस्थापक श्रीराम शेळके, रामपूरी विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक तौर माजी मुख्याध्यापक बाबुराव टकले, माजी क्रिडा शिक्षक भवार यांच्यासह कार्मचारी उपस्थित होते.



नगर रोड बालेपीर बीड येथे रस्ता आणि नाल्याचे विकासकाम मोठ्या प्रमाणावर सुरू असून रोशन पुरा गल्ली नंबर ७ च्या नाली वरील छतवर साधी चार चाकी वाहन गेली असता अशा प्रकारे नाली वरील छत कोसळल्याने विकास कामाचा निष्कृष्ट दर्जा पाहायला मिळाला आहे.

## सोनोशी ग्रामस्थांची भगवानगडाला ७७ लाख रुपये देणगी जाहीर

भगवानगड । प्रतिनिधी

श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू आहेत. गडाच्या भक्तवर्गापैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.



श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे सोनोशी (ता.पाथर्डी जि. अहिल्यानगर) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही ७७ लाख रुपये झाली. नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT